X - MARATHI GRAMMAR - (CBSE)

कथालेखन

* कथा म्हणजे गोष्ट . आपल्याला लहानपणापासून गोष्टी आवडतात. आपल्याला गोष्ट ऐकायला आवडते तसेच गोष्ट सांगायलाही आवडते.

* कथालेखन या शब्दात लेखन हा शब्द आहे. कथा किंवा गोष्ट तर नेहमी सांगितली जाते. आपण कथा अशा रितीने लिहूया की आपण सांगत आहोत.

* कथालेखन म्हणजे गोष्ट रचून ती लिहून दाखविणे.

* **कथालेखन करतांना काही लक्षात ठेवावयाच्या बाबी:-**

१. कथा लिहितांना ती ज्या क्रमाने घडली त्याच क्रमाने लिहू नये. तसे केले तर ती कंटाळवाणी होण्याचा संभव असतो.

२. गोष्टीची सुरूवात आकर्षक असावी.

३. गोष्टी लिहितांना तुमची भाषा साधी व सूटसूटीत असावी.

४. गोष्टीचा शेवटही परिणामकारक असावा.

५. कथा शक्यतो भूतकाळात असावी.

६. व्यक्ती, नगरे, राज्य , प्राणी यांना काल्पनिक नावे असावीत.

७. प्रसंगानुरूप संवाद रचना असावी.

८. वाचणा-याला विचारात घेऊन कथालेखन करावे.

* **तुम्हाला पुढीलप्रमाणे विविध प्रकारच्या गोष्टी लिहायला सांगतात.**

१. एखादी घटना ऐकून ती परत तुमच्या भाषेत पुन्हा लिहायाला सांगतात.

२. चित्रे पाहून गोष्ट रचायला सांगतात.

३. अर्धवट गोष्ट पूर्ण करायला सांगतात.

४. गोष्टीचे शीर्षक , प्रसंग किंवा एखादी म्हण देऊन गोष्ट लिहायला सांगतात.

५. मुद्यांवरून गोष्ट लिहायला सांगतात.

* **पुढीलपैकी दिलेल्या मुद्यांच्या आधारे १५० ते २०० शब्दात कथा लिहा.**

1) मुद्दे : उंट व कोल्हा दोघे मित्र -- नदीच्या पलिकडे ऊसाचे शेत -- दोघांना ऊस खाण्याची इच्छा -- उंटाच्या पाठीवर बसून कोल्हयाचे जाणे -- दोघांचे ऊस खाणे -- कोल्हयाचे ओरडणे -- राखणदारास पाहून कोल्हयाचे पळून जाणे -- उंटास मार -- ब-याच वेळाने कोल्हयाचे येणे -- पुन्हा उंटाच्य पाठीवर बसणे -- उंटाला नदीत लोळण्याची इच्छा -- कोल्हयाचे घाबरणे -- विनंती करणे -- अद्दल घडणे.

2) मुद्दे : रायगडाच्या पायथ्याशी गाव -- हिरा गवळण -- कोजागिरी पौर्णिमा -- दूध विकायला गडावर जाणे -- पाळण्यात लहान बाळ झोपलेले -- परतायला उशीर -- गडाचे दरवाजे बंद -- रक्षकांनी विनंती नाकारणे -- एक धोकादायक कडा -- उतरायला सुरुवात -- रातकिडे -- भयानक उतार -- काटे,कुटे झाडी पार करुन जाणे -- बाळाचे लाड -- शिवाजीराजांना धाडसाची कथा कळणे -- सन्मान, साडी, चोळी, ओटी भरणे -- हिरकणी बुरुज.